# प्रेस नोट दि.०७/०६/२०२३

## अंमली पदार्थ विरोधी पथकाने एकुण १०,६४,३००/- रुपये किंमतीचा एकुण ४१ किलो गांजा हा अंमली पदार्थ जप्त केला.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारा अंमली पदार्थ, ड्रग्स विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री बाळासाहेब कोपनर सो व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतिश पवार, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे पहिल्या कारवाईमध्ये दि.०६/०६/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील वपोनि श्री. सतिश पवार, सहा.पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी व पोलीस अंमलदार असे भोसरी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना **पोलीस अंमलदार विजय दौंडकर व प्रसाद जंगिलवाड** यांना त्याचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, भोसरी गावठाण, मुंजाबा चौक, फुगे माने आळी, भोसरी पुणे येथे असलेल्या मुंजाबा चौक येथे एका इसमाने गांजा हा अंमली पदार्थ विक्री करीता साठवणुक करुन ठेवला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्या वरुन आम्ही सदर ठिकाणी छापा टाकला असता, सदर ठिकाणी इसम नामे संजय मोहन शिंदे, वय ३६ वर्षे, रा बुध्द मंदिराचे मागे, बालाजीनगर, नेहरुनगर, भोसरी एम.आय.डी.सी. पुणे याचे ताब्यातुन एकुण ७,८१,७००/- रुपये किंमतीचा एकुण ३१ किलो २६८ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. त्याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा इसम नामे सुरज झंजाळ, रा नक्की पत्ता संपुर्ण पत्ता माहिती नाही रा चाकण ता खेड जि पुणे याचेकडुन आणला असल्याचे सांगितल्याने सदर इसमांविरुध्द विरुध्द भोसरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दुसऱ्या कारवाईमध्ये दि.०६/०६/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील वपोनि श्री. सतिश पवार, पोउपनि श्री. राजन महाडीक व पोलीस अंमलदार असे म्हाळुंगे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना **पोलीस अंमलदार संदीप पाटील व अशोक गारगोटे** यांना त्याचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रुद्रा हॉटेलसमोर, भामचंद्ररोड, वासुली फाटा, वासुलीगाव ता.खेड जि.पुणे येथे एक इसम गांजा हा अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्या वरुन आम्ही सदर ठिकाणी छापा टाकला असता, सदर ठिकाणी इसम नामे रविंद्र काशीराम राठोड वय ३८ वर्षे रा. मोरे कॉम्पलेक्स कडुस ता.खेड जि.पुणे मुळगाव वडगाव पोस्ट पिंजर ता.बार्शी टाकळी जि.अकोला याचे ताब्यातुन एकुण २,८२,६००/- रु. किं. चा माल, त्यामध्ये २,५२,६००/- रु. किं.चा १० किलो १०४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व ३०,०००/- रु. किं.ची बजाज कंपनीची डिस्कव्हर टु व्हिलर गाडी क्र. एमएच १४ सीए ५७६० हिचेसह गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. त्याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा इसम नामे विकास बधाले रा. नवलाखउंब्रे ता.मावळ जि.पुणे याचेकडुन व इसम नामे पठारे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही याचेकडुन विकत घेतला असल्याचे सांगितल्याने सदर इसमांविरुध्द विरुध्द म्हाळुंगे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अशा प्रकारे दोन कारवाईमध्ये ०२ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन एकुण १०,६४,३००/- रुपये किंमतीचा एकुण ४१ किलो ३७२ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त केला आहे.**

सदरची कामगीरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.सह पोलीस आयुक्त श्री. डॉ.संजय शिंदे, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. बाळासाहेब कोपनर, यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार, सहा.पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी , पोलीस उप-निरीक्षक राजन महाडीक व पोलीस अंमलदार, पोहवा प्रदिप शेलार, पो.हवा. दिनकर भुजबळ, पो.हवा. संतोष दिघे, पोलीस हवा. संदीप पाटील, पोना मनोज राठोड, पोना मयुर वाडकर, पो.ना.संतोष भालेराव, पोना विजय दौंडकर, पो.ना. प्रसाद कलाटे, पो.ना. दादा धस, पो.शि. प्रसाद जंगिलवाड, पोशि रणधीर माने, पोशि मितेश यादव, पोशि सदानंद रुद्राक्षे, पोशि अशोक गारगोटे, पो.शि.कपिलेश इगवे, पो.शि.पाडरंग फुंदे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड